॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)



जा.क्र.कबचौउमवि/०६/प्र.पा./शुल्क/ ६८ /२०२५ दि. १०.०७.२०२५

**परिपत्रक क्र. ४२/२०२५**

**प्रति,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नीत सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये, व्यावसायिक,
अव्यावसायिक अभ्यासक्रमांचे मा.प्राचार्य आणि मान्यता प्राप्त परिसंस्था यांचे मा.संचालक
तसेच शैक्षणिक प्रशाळा/विभाग यांचे मा.संचालक, विभागप्रमुख यांना..

**विषय :- करिअर कट्टा या उपक्रमाचे शुल्क विद्यापीठ शुल्क रचने अंतर्गत विविध गुणदर्शन व उपक्रम शुल्क (Extra-curricular वा activity fees) या शीर्षकांतर्गत अंतर्भूत करणेबाबत.**

**संदर्भ :-** १) संचालनालयाचे पत्र क्रमांक: विद्यार्थी २११९/प्र.क्र.२७/मवि-१/२१०५ दि.१८.२.२०२१
२) शासन पत्र क्र.: संकीर्ण २३२३/प्र.क्र.११५/मशि-२ दि. ६ जून, २०२३
३) अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र- कोल्हापूर यांचे पत्र क्र.: MITSC/OUT/FEBRUARY 2023/M/1313 FN. ९.२.२०२३
४) मा.सह संचालक यांचे पत्र जा.क्र.ससंउशि/जविज/करिअर कट्टा/परिपत्रक/२०२३/११३६, दि. २८.०३.२०२३
५) मा.सहा. कुलसचिव, प्रवेश व पात्रता विभाग, कबचौउमवि. यांचे पत्र जा.क्र.कबचौउमवि/०६/प्र.पा./८६/२०२४ दि. ०२.०८.२०२४
६) मा.प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.: उशिसं/मवि-१/परिपत्रक-करिअर कट्टा/२०२५/ई. ऑफीस- १८०४२२६ दि. १९/०६/२०२५

**महोदय / महोदया,**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या " **करिअर कट्टा** " या उपक्रमांबाबत प्रस्ताव संदर्भ क्र. ४ सोबत प्राप्त झाला आहे. वरील प्राप्त झालेला प्रस्ताव विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांपुढे ठेवण्यात आला असता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला :

" सदर उपक्रमाचे शुल्क विद्यापीठाने व महाविद्यालयांनी विद्यार्थी प्रवेश शुल्कामध्ये विविध गुणदर्शन / उपक्रम शुल्क **(Extra Curriculum / Activity Fee)** या शिर्षाखालील व्यक्तिमत्व विकास व रोजगार मार्गदर्शन **(Personality Development / Career Guidance Fee)** मध्ये करिअर कट्टा शुल्क रू. ३६५ घेता येऊ शकेल. सदर शुल्क विद्यापीठाच्या प्रवेश पात्रता विभागाचे पत्र क्र. जा.क्र. कबचौउमवि/६/प्रपा/शुल्क/१४७/२०२२, दि. १२/०९/२०२२ नुसार शासनाची शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिष्यवृत्ती शुल्क मध्ये परत मिळेल." असे संदर्भ क्र. ५ नुसार कळविण्यात आलेले आहे.

तथापि नुकतेच संदर्भ क्र. ६ नुसार " **करिअर कट्टा** " या उपक्रमाची अंमलबजावणी करत असताना, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत महाविद्यालयाच्या शुल्क निर्धारणाची विविध अधिकार मंडळांची विहीत प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर " करिअर कट्टा " या उपक्रमाचे शुल्क (रु. ३६५/-) हे वेगवेगळ्या शीर्षकांतर्गत समाविष्ट केले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर उपक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता राखण्यासाठी " करिअर कट्टा " या उपक्रमासाठीचे नोंदणी शुल्क (रु. ३६५/-) हे विद्यापीठ शुल्क रचने अंतर्गत **' विविध गुणदर्शन व उपक्रम शुल्क ' (Extra-curricular वा activity fees)** या शीर्षकांतर्गत समाविष्ट करण्यात यावे.

.. २ ..

तरी वरील परिपत्रकानुसार कार्यवाही करुन आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल **प्रवेश व पात्रता विभागास दि. ३१.०७.२०२५** पर्यंत सादर करावा. त्यानंतर एकत्रित अहवाल सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव यांना पाठविण्यात येईल.

कळावे.

(डॉ. विनोद प्र. पाटील)
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी :-**

१. मा. प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव.
३. मा. कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
४. मा. प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
५. मा. कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
६. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
७. मा. वित्त व लेखा अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
८. मा. संचालक, विद्यार्थी विकास, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
९. समन्वयक, ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.